2

(9) २००५-०६
११/०/२००५.

<u>कायम विना अनुदानित तत्वावरील प्राथमिक शाळांचे परवानगी आदेश.</u>

महाराष्ट्र शासन

क्रमांकः नप्राशा १००५/(७६/२००५)/प्राशि -३
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० जून, २००५.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर / पुणे

**विषय : सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त इतर माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळा कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत**

नविन प्राथमिक शाळेस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे सन २००४-२००५ या शैक्षणिक वर्षात प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील १७ (सतरा) शैक्षणिक संस्थांना तिच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त (मराठी, हिंदी, उर्दू, गुजराथी ) सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) <u>कायम विना अनुदान तत्वावर</u> व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास "जून २००५" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे. परवानगी देण्यापूर्वी सदर संस्थेकडून रु.२०/- एवढया रकमेच्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही, असे हमी पत्र संस्थेकडून प्रथम लिहून घ्यावे. सदरहू हमीपत्र आपल्या कार्यालयातील संबंधीत नस्तीवर कायम स्वरुपी जतन करुन ठेवावे व त्याच्या प्रती प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात याव्यात. त्याची प्रत शासनासही माहितीस्तव सादर करावी.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र क्र.व्हीएलएस १०००/(५५७/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक १६ सप्टेंबर, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन त्याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

( सु.ह. उमराणीकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सांगली / पुणे.
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

शासन पत्र क्रमांक नप्राशा-१००५/(७६/०५)/प्राशि-३,दिनांक : १० जून, २००५ चे सहपत्र.

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात कायम विना अनुदानित मराठी माध्यमाच्या परवानगी दिलेल्या प्राथमिक शाळांची नांवे.

## जिल्हा - सांगली

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | सिध्दीविनायक शिक्षण संस्था, वसंतनगर, यशवंतनगर (कुपवाड),ता.मिरज | यशवंतनगर, कुपवाड | मराठी | १ ली |
| २ | भारतीय महिला शिक्षण संस्था, कचेरी रोड, इस्लामपूर | शिराळा | मराठी | १ ली |
| ३ | सन्मान शिक्षण संस्था, सुखवाडी, ता. पलूस | वसगडे, ता. पलूस | मराठी | १ ली |
| ४ | सन्मान शिक्षण संस्था, सुखवाडी, ता.पलूस | पलूस | मराठी | १ ली |
| ५ | सांगली शिक्षण संस्था, सांगली | माधवनगर | मराठी | १ ली |
| ६ | मुस्लिम एज्युकेशन कमिटी, सांगली | सांगली | मराठी | १ ली |
| ७ | विजयश्री शिक्षण संस्था, सांगली | संजयनगर, शिंदेमळा, सांगली | मराठी | १ ली |
| ८ | श्री. अंबाबाई तालीम संस्था, ब्राम्हणपूरी, मालगांव | मिरज, जि.सांगली | मराठी | १ ली |
| | **जिल्हा - पुणे.** | | | |
| ९ | जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ, सराटी, ता.इंदापूर, जि.पुणे | सराटी, ता. इंदापूर, जि. पुणे | मराठी | १ ली |
| १० | ज्ञानप्रकाश शिक्षण संस्था, नसरापूर, ता.भोर,जि.पुणे | नसरापूर, ता. भोर, जि.पुणे. | मराठी | १ ली |
| ११ | गेनबा सोपनराव मोझे ट्रस्ट, १९१, महाराष्ट्र हौसींग बोर्ड, येरवडा, पुणे-६ | संगमवाडी, पुणे-३. | मराठी | १ ली |
| १२ | नवजीवन शिक्षण संस्था, दिघी,ता.हवेली, जि.पुणे | दिघी, ता.हवेली, जि. पुणे | मराठी | १ ली |
| १३ | भारती विद्यापीठ लालबहादूर शास्त्री मार्ग, पुणे ३० | लवळे, ता.मुळशी, जि.पुणे | मराठी | १ ली |
| १४ | भारती विद्यापीठ लालबहादूर शास्त्री मार्ग, पुणे ३० | मांगडेवाडी | मराठी | १ ली |
| १५ | शास्वत संस्था, बी ३ समर्थ कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, मार्केटयार्ड समोर, मुंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे | आघाणे | मराठी | १ ली |
| १६ | महात्मा फुले विद्यानिकेतन संस्था, ससाणेनगर, हडपसर, पुणे २८ | साडेसतरानळी, ता.हवेली, शाखा-३,सर्व्हे नं. २०३ | मराठी | १ ली |
| १७ | बालग्राम एसओएस चिल्ड्रन्स व्हिलेजस, महाराष्ट्र पुणे, येरवडा | येरवडा, पुणे | मराठी | १ ली |

एकूण : १७ (सतरा) प्राथमिक शाळा.